# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org

Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913


**परिपत्रक -**

जा.क्रमांक :- विकाअ/आस्था/२०१८/2223

दिनांक :- 18 SEP 2018

प्रति,

प्राचार्य,
सर्व शासकीय/अनुदानित/विनाअनुदानित/अशासकीय,
पदवि /पदविका संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त आराखडा तयार करण्याबाबत.**

**संदर्भ :-** मा. तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्रराज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्र.: १६/गांधी जयंती/१५० /२०१८/५६१, दि. १७/०९/२०१८

उपरोक्त विषयासंदर्भात माननीय केंद्रीय मानव संसाधन मंत्री यांनी महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त वर्षभराचा कार्यक्रम आयोजित करण्याच्या दृष्टेने कार्यवाही करण्याबाबतच्या सुचना दिल्या असल्याबाबत तसेच संचालक, तंत्रशिक्षण यांना संपुर्ण कार्यवाहीवर देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठी नियुक्त केले असल्याबाबत उक्त संदर्भान्वये या कार्यालयास कळविण्यात आले आहे.

तरी आपण आपल्या संस्थेमध्ये खाली देण्यात आलेल्या कार्यक्रमांची अंमलबजावणी करावी. व त्याबाबत विनाविलंब संपूर्ण तपशिलासह या कार्यालयास अवगत करावे.

१. महात्मा गांधी यांच जीवनावर आधारीत सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी राज्यस्तर व राष्ट्रीयस्तरावर नाटकांचे रंगमंचावरील कार्यक्रम, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आयोजित कराव्यात.
२. स्वच्छता अभियानांतर्गत कार्यक्रम सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी आयोजित करावेत.
३. श्रमदानाचे कार्यक्रम सर्व विद्यापीठे, महाविद्यालय तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी आयाजित करावेत.
४. मानव संसाधन विकास विभागाने, महाराष्ट्रशी ज्या दुस-या राज्याची जोड ठरवून दिलेली आहे, त्या राज्याशी संपर्क करुन विद्यार्थ्यांची देवाण घेवाण कार्यक्रम राबविणे.
५. सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी महात्मा गांधी यांच्या जीवनावर विद्यार्थ्यांचे गीत गायनाचे / भजन गायनाचे कार्यक्रम आयोजित करावेत.
६. सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी या कालावधीत एक खेडे दत्तक घेऊन तेथील सामाजिक केंद्रामध्ये स्वच्छता अभियान व स्वच्छ भारत अभियान यांची माहिती देऊन तो उपक्रम राबवावा.
७. महात्मा गांधींचा त्यांच्या जीवन कालावधीत महाराष्ट्रतील ज्या स्थळांशी संपर्क आला उदा. वर्धा, पवनार, पुणे, मुंबई इत्यादी ठिकाणी पदयात्रा आयोजित करुन जनजागृती करावी.
८. सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी महात्मा गांधींच्या विचारांवर आधारीत वक्तृत्व स्पर्धा आयोजित कराव्यात. या विषयावर राज्यस्तर व राष्ट्रीय स्तरावर प्रसिध्द व्यक्तींना भाषणे देण्यासाठी आमंत्रित करावे.
९. सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी विद्यार्थ्यांकडून सार्वजनिक ठिकाणी महात्मा गांधींच्या विचारांचे भित्तीचित्रे तयार करुन घ्यावीत व त्यांचे मोठया प्रमाणात प्रदर्शन करावे.
१०. सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या वाचनालयांमध्ये महात्मा गांधींच्या जीवनावरील विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय लेखकांनी लिहिलेली पुस्तके मोठया प्रमाणात विद्यार्थी वाचकांसाठी

१०. सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या वाचनालयांमध्ये महात्मा गांधींच्या जीवनावरील विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय लेखकांनी लिहिलेली पुस्तके मोठ्या प्रमाणात विद्यार्थी वाचकांसाठी उपलब्ध करून द्यावीत. तसेच गुजरात, राजस्थान, बिहार इ. राज्यांनी महात्मा गांधींच्या विचारावर आधारित काही पुस्तके प्रसिध्द केली आहेत. ती सुध्दा त्यांच्या वाचनालयात उपलब्ध करून द्यावीत.

११. सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी महात्मा गांधींचे सामाजिक कार्य व विचारांचा सर्व राज्यात प्रचार व प्रसार करण्याच्या दृष्टीने वार्षिक दिनदर्शिका तयार करावी व त्यानुसार तात्काळ कार्यवाही करावी.

१२. बिहार शासनाने महात्मा गांधींच्या जीवनावर प्रसिध्द केलेल्या बापू की कहानीया पुस्तकाचे मराठीत भाषांतर करून घेऊन ती पुस्तके सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या वाचनालयांमध्ये उपलब्ध करून देणे संदर्भात तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

१३. सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी महात्मा गांधींच्या भजनांच्या गायनाचे कार्यक्रम या कालावधीत प्राधान्याने आयोजित करावेत.

१४. सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या सर्व विद्यार्थ्यांच्या रॅली / पदयात्रा काढाव्या आयोजित कराव्या व त्यात सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग अनिवार्य करावा.

तरी सदर कार्यक्रमांबाबत आपण स्वतः जातीने लक्ष घालून कार्यक्रम राबवावेत व प्रत्येक कार्यक्रमाचा स्पष्ट छायाचित्र, व्हीडीओ यांना आपल्या स्तरावर योग्य ती प्रसिध्दी देण्यात यावी व याबाबतचा दैनंदिन अहवाल न चुकता या कार्यालयास आवश्यक त्या तपशिलासह सादर करण्यात यावा.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.

प्रत :-

१. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (कार्यासन क्र.१६) यांना माहितीकरीता सादर
२. श्री. नि. आ. इंगळे, प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना कळविण्यात येते की, उपरोक्त कार्यक्रमांचा संस्थांकडून प्राप्त दैनंदीन अहवाल संचालनालयास अद्ययावत माहितीसह कळविण्याची जबाबदारी आपणावर सोपविण्यात येत आहे. याकरीता श्रीमती सुचित्रा रणदिवे, सहा. संचालक (कार्यासन क्र. १६) यांचेशी संपर्कात रहावे आणि अनुपालन केलेली कार्यवाही निम्नस्वाक्षरीकारांना अवगत करावी.